जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १७१ | सोमवार, १२ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







# पुण्यात महिलांसाठी सवलती, घरांना मिळकतकर माफीसह मोठ्या घोषणा

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे) पक्षाचा 'शब्द शिवसेनेचा' जाहीरनामा प्रसिद्ध

**अश्लेषा मस्के**

पुणे, ता. ११ : महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. निवडणुकीच्या पार्श्व भूमीवर प्रत्येक पक्षाने आपापला जाहीरनामा जाहीर केला असून त्यामध्ये पुणेकरांसाठी विविध आश्वासने देण्यात आली आहेत. पुणे शहरातील वाहतूक, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि नागरी सोयी-सुविधांवर लक्ष केंद्रित करत शिवसेना शिंदे पक्षाने शब्द शिवसेनेचा या नावाने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.

हा जाहीरनामा पक्षाचे प्रमुख नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आला असल्याची माहिती पक्षाच्या नेत्या डॉ. निलम गोऱ्हे यांनी दिली. पुणे महानगरपालिकेची निवडणूक शिवसेना शिंदे पक्ष स्वबळावर लढवत असून पुणेकरांच्या समस्यांवर ठोस उपाययोजना करण्याचा निर्धार पक्षाने व्यक्त केला आहे. गेल्या काही वर्षांपासून पुणे शहरातील नागरिक वाहतूक कोंडी, प्रदूषण, पर्यावरणाची हानी, खराब रस्ते आणि अपुऱ्या आरोग्य सुविधा यांसारख्या अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. या सर्व प्रश्नांवर काम करून शहराचा चेहरामोहरा बदलण्याची भूमिका शिवसेना शिंदे पक्षाने मांडली आहे.

जाहीरनाम्यात पुणे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी मेट्रोचा विस्तार करण्यात येणार असून महिलांना पीएमपीएमएल बस प्रवास निम्म्या दरात उपलब्ध करून दिला जाणार आहे. शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर भुयारी मार्ग उभारले जाणार असून मुठा नदीत नौकानयन सुरू करण्याची योजना आहे. शहराचे पर्यावरण टिकवण्यासाठी डोंगरमाथा आणि डोंगर उतारावर बांधकामाला



बंदी घालण्यात येणार आहे. तसेच ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मिळकतकर माफी देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी दरवर्षी किमान ५ लाख झाडे लावली जाणार आहेत. वारकऱ्यांसाठी वारकरी भवन आणि वकिलांसाठी ॲडव्होकेट भवन उभारण्यात येणार आहे. वन विभागाकडून पकडण्यात येणाऱ्या बिबट्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि निसर्गसंपन्न बिबट्या प्राणीसंग्रहालय उभारले जाणार आहे. महापालिकेच्या माध्यमातून नवीन प्रसूतीगृहे उभारून मोफत बाळंतसेवा देण्यात येणार आहे.

पुणे शहरातील १८ वर्षांवरील मुलींना पदवी परीक्षेत ९२ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाल्यास स्कूटी देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. घरकाम करणाऱ्या महिलांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोफत आरोग्य सेवा दिली जाणार आहे. मेट्रो स्टेशनजवळ आणि शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी बहुमजली पार्किंग व्यवस्था उभारली जाणार आहे. प्रत्येक प्रभागात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरू करण्यात येणार असून दक्षिण पुण्यात ससून रुग्णालयाच्या धर्तीवर दुसरे रुग्णालय उभारले जाणार आहे.

एमपीएससी आणि यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. शहरातील प्रत्येक झोपडपट्टीधारकाला ५५० चौरस फुटांचे मोफत घर देण्यात येणार असून २०२५ पर्यंतच्या झोपडपट्ट्या नियमित करण्यात येणार आहेत. शनिवारवाड्याचे पुनर्बांधणी, शिवसृष्टी प्रकल्पाचा विस्तार, बालगंधर्व रंगमंदिराची पुनर्बांधणी आणि कात्रजप्रमाणे नवीन प्राणीसंग्रहालय उभारण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.

महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातून पुणेकरांना कागदी आणि कापडी पिशव्या मोफत देण्यात येणार असून कचरामुक्त पुण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जाणार आहे. भयमुक्त पुणे घडवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असेही जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, महापालिकेत शिवसेनेची सत्ता आल्यास प्राधान्याने कोणत्या गोष्टींवर काम केले जाईल, याची सविस्तर माहिती या जाहीरनाम्यात देण्यात आली असून पुणेकरांच्या विकासासाठी आणि सोयीसाठी पक्ष कटिबद्ध असल्याचे शिवसेना शिंदे पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

---



## मुंबईसाठी महायुतीचा वचननामा जाहीर

**मुंबई, ता. ११ :** राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकीला अवघे काही दिवस शिल्लक राहिले असताना प्रत्येक राजकीय पक्षांकडून मतदारांना प्रभावित करण्यासाठी विविध घोषणाबाजी केली जात आहे. अशातच आता महायुतीकडून रविवारी (ता. ११) जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामध्ये लाडक्या बहिणींना आता पाच लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज देणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपाईचे नेते रामदास आठवले आणि महायुतीमधील घटक पक्षांनी एकत्र येत आज जाहीरनामा प्रसिद्ध केला.या जाहीरनाम्यात मुंबईतील लाडक्या बहिणींना लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, महिलांना बेस्ट प्रवासात ५० टक्के सूट, पालिकेत स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करणार या सारख्या अनेक घोषणा महायुतीकडून करण्यात आल्या.

या वचननाम्यात संपूर्ण मुंबईला २४ तास पाणीपुरवठा, पुढील पाच वर्षे पाणीपट्टी स्थिर ठेवण्याचे आश्वासन देण्यात आलंय. तसेच बेस्ट बस प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, बस ताफा १० हजारांपर्यंत वाढवणे आणि २०२९ पर्यंत सर्व बसेस इलेक्ट्रिक करण्याची घोषणा करण्यात आलीय.

दरम्यान, पायाभूत सुविधांसाठी काँक्रिटीकरण, पार्किंग, पूरनियंत्रण, पर्यावरण संरक्षणावर भर देण्यात आलाय.


महिलांसाठी बिनव्याजी कर्ज, पाळणाघरे, सुरक्षा योजना तर मराठी भाषा-संस्कृती संवर्धनासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचे आश्वासन महायुतीनं दिलंय.

---

## भारतीय वंशाच्या आदित्य अशोकचे न्यूझीलंड संघाकडून क्रिकेटमध्ये पदार्पण

**बडोदा, ता. ११ :** न्यूझीलंडविरुद्धचा पहिला वनडे सामना बडोद्यात खेळवला जात असून, यंदाच्या वर्षातील हा पहिलाच वनडे सामना असल्यामुळे क्रिकेट चाहत्यांची उत्सुकता चांगलीच वाढली आहे. या सामन्याच्या निमित्तानं न्यूझीलंड संघातील एका खास खेळाडूची जोरदार चर्चा रंगताना दिसतेय.

ही चर्चा आहे आदित्य अशोक या भारतीय वंशाच्या लेगस्पिनरची. मूळचा तमिळनाडूचा असलेला आदित्य सध्या न्यूझीलंडच्या जर्सीत खेळतोय. त्याचं बालपण सिंगापूरमध्ये गेलं आणि नंतर तो न्यूझीलंडमध्ये स्थायिक झाला. भारतीय वंशाचा खेळाडू भारताविरुद्ध न्यूझीलंडकडून खेळताना पाहणं,



हे अनेक चाहत्यांसाठी कुतूहलाचं ठरत आहे.

आदित्यने डिसेंबर २०२३ मध्ये बांगलादेशविरुद्ध वनडे क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. त्याआधी ऑगस्ट २०२३ मध्ये यूएईविरुद्ध त्याने एकमेव टी-२० सामना खेळला होता. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याची कामगिरी लक्षवेधी ठरली आहे. फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये त्याने आतापर्यंत ७८ विकेट्स घेतल्या असून, १०३ धावांत ७ विकेट्स ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. लिस्ट-ए क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ५२ विकेट्स आहेत, तर टी-२० फॉरमॅटमध्ये त्याने ३१ फलंदाजांना बाद केलं आहे. त्यामुळे आदित्यला एक धोकादायक गोलंदाज मानलं जातं. विशेष म्हणजे, त्याने चेन्नई सुपर किंग्सच्या ट्रेनिंग कॅम्पमध्येही सराव केला आहे.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, २०२० च्या अंडर-१९ वर्ल्ड कपमध्ये आदित्य न्यूझीलंडकडून खेळला होता. त्या स्पर्धेत त्याने भारताच्या यशस्वी जयस्वाल, ध्रुव जुरेल आणि तिलक वर्मा यांच्याविरुद्ध गोलंदाजी केली होती. आता पुन्हा एकदा तोच सामना, तोच संघर्ष आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहायला मिळणार आहे.


दरम्यान, प्रत्येक चेंडूवर फलंदाजाला अडचणीत टाकण्याची क्षमता आदित्यकडे आहे. भारतीय खेळपट्ट्या फिरकीला पोषक असल्यामुळे या सामन्यात तो आपली जादू दाखवू शकतो. त्यामुळे भारतीय फलंदाजांना त्याच्या ओव्हर्समध्ये सावधपणे खेळावं लागणार आहे. विशेषतः रोहित शर्मा आणि विराट कोहलीविरुद्ध तो कशी गोलंदाजी करतो, याकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं आहे.

---

## रवींद्र धंगेकरांनी शेअर केला चंद्रकांत पाटील व गुंड निलेश घायवळचा एकत्र फोटो

**पुणे, ता. ११ :** राज्यात महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला असून विविध शहरांत नेत्यांच्या सभा, बैठका आणि प्रचार कार्यक्रम सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची धार वाढली आहे. महायुतीतील घटक पक्षांचे नेतेही परस्परांवर टीका करताना दिसत आहेत. अशातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते व माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी भाजपाचे नेते तथा मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

अमोल बालवडकर यांना उमेदवारी का नाकारण्यात आली, याबाबत चंद्रकांत पाटील यांनी एका कार्यक्रमात भाष्य केले होते. बालवडकर यांच्याशी संबंधित गुंडांसोबतचा व्हायरल व्हिडीओ



कारणीभूत ठरल्याचा दावा त्यांनी केला होता. या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर रवींद्र धंगेकर यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर प्रत्युत्तरादाखल टीका केली आहे.

रवींद्र धंगेकर यांनी एक्स या समाजमाध्यमावर एक पोस्ट शेअर करत काही छायाचित्रे प्रसिद्ध केली आहेत. या छायाचित्रांमध्ये चंद्रकांत पाटील आणि कुख्यात गुंड निलेश घायवळ एकत्र दिसत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यावरून टीका करताना धंगेकर यांनी, गुंडगिरीविषयी नैतिकतेचे धडे देणाऱ्या चंद्रकांत पाटील यांनी बालवडकर यांच्यावर लावलेल्या निकषांनुसार स्वतःही जबाबदारी स्वीकारावी, असे म्हटले आहे. धंगेकर यांनी पुढे असा सवालही उपस्थित केला की, जर गुंडांसोबतच्या संबंधांबाबत इतकी संवेदनशीलता असती, तर कोथरूड परिसरात गुंडगिरी वाढली असती का? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी भाजपावर अप्रत्यक्ष टीका केली आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊसच्या जमिनीच्या व्यवहारावरून रवींद्र धंगेकर यांनी भाजपाचे नेते तथा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावरही आरोप केले होते. त्यामुळे पुण्यात शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपामधील राजकीय वाद अधिक तीव्र झाल्याचे चित्र दिसून आले आहे.

---

## पुण्यात वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून वाहतूक पोलिसाची आत्महत्या

**पुणे, ता. ११ :** तळेगाव दाभाडे येथे कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वरिष्ठांच्या मानसिक छळाला कंटाळून हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये करण्यात आला आहे. या घटनेमुळे पुणे पोलीस दलात खळबळ उडाली असून पोलीस खात्यातील अंतर्गत कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

माधव केरबा डोके वय ३६ असे आत्महत्या केलेल्या वाहतूक पोलिसाचे नाव आहे. माधव डोके हे तळेगाव दाभाडे वाहतूक विभागात कार्यरत होते. त्यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या मानसिक छळाचा उल्लेख केला आहे. कर्तव्यावर असताना पावती न फाडता वाहन सोडण्यास सांगितले जात



होते आणि संध्याकाळी भेटायला बोलावले जात होते, असा आरोप त्यांनी केला आहे. त्यांनी या चुकीच्या आदेशांना नकार दिल्यानंतर वरिष्ठांनी शिवीगाळ केल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

सुसाईड नोटमध्ये माधव डोके यांनी असेही लिहिले आहे की, स्टेशन चौकातील नो एन्ट्रीमध्ये पैसे घेऊन वाहन सोडले जात असल्याची बाब त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. मात्र त्यानंतर उलट त्यांनाच शिवीगाळ करण्यात आली आणि मानसिक त्रास देण्यात आला. हा मनस्ताप सहन न झाल्यामुळे आपण आत्महत्या करत असल्याचे त्यांनी सुसाईड नोटमध्ये नमूद केले आहे. माधव डोके यांची सुसाईड नोट पोलिसांच्या हाती लागली असून त्याच्या आधारे आत्महत्येच्या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. या घटनेमुळे पोलीस दलात एकच खळबळ उडाली असून सहकाऱ्यांमध्ये शोककळा पसरली आहे. दरम्यान, माधव डोके यांच्या आत्महत्येमुळे त्यांच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला असून पोलीस खात्यातील वरिष्ठांच्या वागणुकीबाबत सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली जात आहे. या प्रकरणामुळे पोलिसांवरील मानसिक ताणतणाव आणि अंतर्गत दबावाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

---

## अष्टापूर माळवाडी परिसरात दुसरा बिबट्या जेरबंद; अकरा दिवसांत वनविभागाने दोन बिबटे पकडले

**उरुळी कांचन, ता. ११ :** अष्टापूर (ता. हवेली) हद्दीतील माळवाडी व कलदरा खोल शेत परिसरात गेल्या अकरा दिवसांत दोन बिबटे जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे. अष्टापूर ग्रामस्थांच्या मागणीनुसार वनविभागाने चार ते पाच पिंजरे लावले होते. त्यापैकी मंगळवारी (ता. ३० डिसेंबर) एक बिबटा जेरबंद करण्यात आला होता. त्यानंतर रविवारी (ता.११ जानेवारी) पहाटे आणखी एक बिबटा पिंजऱ्यात अडकला आहे.

या दुसऱ्या बिबट्याने रात्रीच्या वेळी मेंढपाळांच्या वस्तींवर हल्ला करून एका दिवशी एक मेंढी तर दुसऱ्या दिवशी तीन मेंढ्या ठार केल्या होत्या. त्यामुळे शेतकरी व मेंढपाळांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शेतकरी रात्री शेतात पाणी देण्यासाठी जाण्यास घाबरत होते, तसेच उसतोडणी कामगारही उस तोडण्यास तयार नव्हते. दुसरा बिबटा जेरबंद झाल्याने शेतकरी व ग्रामस्थांनी काहीसा सुटकेचा निश्वास सोडला आहे.

मात्र अष्टापूर पठारवाडी येथील उसाच्या शेतामध्ये यापूर्वी बिबट्याची पिल्ले आढळून आल्याने परिसरात अजूनही बिबट्यांचा वावर असल्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे विविध ठिकाणी अधिक पिंजरे लावून उर्वरित बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक शामराव कोतवाल, माजी संचालक श्रीहरी



कोतवाल, अष्टापूरच्या सरपंच पुष्पा कोतवाल, माजी सरपंच कविता जगताप, उपसरपंच संजय कोतवाल, माजी उपसरपंच सोमनाथ कोतवाल, शैला कोतवाल, रमेश कोतवाल, दत्तात्रेय कटके, कालिदास कोतवाल, उद्योजक राजेश कोतवाल, पोपट कोतवाल आदींनी उर्वरित बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, गेल्या ११ दिवसांमध्ये दुसरा बिबट्या जेर बंद करण्यात वन विभागाला यश गेल्या दोन दिवसांपूर्वी याच बिबट्याने अष्टापुर माळवाडी येथील बिरोबाचा माळ येथे चार मेंढ्या मारल्या होत्या त्यामुळे मेंढपाळांनी बिबट्या जेरबंद केल्यामुळे समाधान व्यक्त केले आहेववनविभागाच्याकामगिरीचे कौतुक केले आहे. मेंढपाळांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी केले असून संबंधित शेतकरी व मेंढपाळांना लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली आहे.


## संक्षिप्त

### नितेश राणेंच्या हत्येचा कट?; बंगल्याच्या बाहेर सापडली बेवारस बॅग



**मुंबई, ता. ११ :** भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांच्या मुंबईतील 'सुवर्णगड' या बंगल्याबाहेर एक बेवारस बॅग सापडल्याने खळबळ उडाली. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण असून घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. नितेश राणे नेहमीच आपली आक्रमक भूमिका मांडत असतात, त्यामुळे त्यांच्या घराबाहेर अशी संशयास्पद वस्तू मिळणे ही सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर बाब मानली जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने बंगल्याबाहेर बंदोबस्त वाढवला आहे. विशेष पथकांकडून त्या बॅगची कसून तपासणी केली जात असून त्यामध्ये नेमकेकाय आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी सध्या सर्व परिसराची नाकेबंदी केली आहे. ही बॅग तिथे नेमकी कोणी आणि का ठेवली, याचा शोध घेण्यासाठी पोलीस बंगल्याच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. एखाद्याने खट्याळपणा केला की हा घातपाताचा कट, याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेनंतर राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले असून सर्वांचे लक्ष पोलिसांच्या तपासाकडे लागले आहे.

### राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत संस्कार खिलारेचे यश



**पळसदेव, ता. ११ :** राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या (आर्चरी) स्पर्धेत संस्कार संजय खिलारे या विद्यार्थ्याने १७ वर्षांखालील वयोगटात दुसरा क्रमांक पटकावला. भारतीय शालेय खेळ महासंघ (स्कूल फेडरेशन ऑफ इंडिया) आणि शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, झारखंड राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६९ व्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेत हि कामगिरी केली आहे. ५ ते १० जानेवारी २०२६ या कालावधीत रांची (झारखंड) येथील बिरसा मुंडा थलेटिक्स स्टेडियममध्ये या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. ७ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या १७ वर्षांखालील वयोगटातील इंडियन राऊंड वैयक्तिक एलिमिनेशन प्रकारात संस्कार खिलारे याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत दुसरा क्रमांक पटकावला. संस्कार खिलारे हा गुरुकुल विद्यामंदिर, गोखळी येथे इयत्ता दहावीत शिक्षण घेत असून स्पर्धेसाठी त्याला क्रीडा प्रशिक्षक जुबेर पठाणसर यांचे मार्गदर्शन लाभले. वडील संजय खिलारे आणि आई सुप्रिया खिलारे यांच्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनासह क्रीडा मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनामुळे संस्कारने राष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्कार खिलारेचे क्रीडा क्षेत्रातून तसेच शिक्षण क्षेत्रातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# शाळा परिसरात तंबाखू विक्रीविरोधात राजगड पोलिसांची विशेष मोहीम

**विशाल शिंदे**

भोर, ता. ११ : भोर तालुक्यातील शाळा व शिक्षणसंस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर राजगड पोलीस स्टेशनच्या वतीने १० जानेवारी रोजी सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत विशेष तपास मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत शिंदेवाडी, ससेवाडी फाटा आणि वेळू परिसरात एकाच दिवशी सलग कारवाई करण्यात आली.

शिंदेवाडी गावाच्या हद्दीत भारती विद्यापीठ शाळेच्या परिसरात तपासणी दरम्यान सागर साहेबराव शिंदे हा पानटपरीवरून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याचे आढळून आले. तसेच ससेवाडी फाटा येथे करण्यात आलेल्या स्वतंत्र कारवाईत निखील प्रकाश गोगावले व लक्ष्मण बाळु गोगावले हे शाळेच्या जवळ तंबाखू व सिगारेटची विक्री करताना पोलिसांच्या निदर्शनास आले.

याच दिवशी वेळू गावात जिल्हा परिषद शाळेच्या आवारात व परिसरात तपास मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत सारीका संभाजी पांगारे, सोनाली सचिन खुंटे, संतोष तानाजी पांगारे आणि देवा राम पटेल हे किराणा दुकान व इतर व्यवसायातून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याचे आढळले. तपासात शाळेच्या प्रतिबंधित परिसरातच ही विक्री सुरू असल्याचे स्पष्ट झाले.



या सर्व कारवायांमध्ये तंबाखू, सिगारेट, बिडी, पानमसाला आदी तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणांची कायदेशीर प्रक्रिया पोलीस कॉन्स्टेबल गणेश पंढरीनाथ साळुंकेव अमोल बबन शेडगे यांच्या फिर्यादीवरून करण्यात आली असून, प्रत्यक्ष कारवाईत पोलीस हवालदार मुंढे यांनी सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड करत आहेत. ही मोहीम प्रभारी पोलीस निरीक्षक गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

दरम्यान, शाळा, महाविद्यालये व शिक्षणसंस्थांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे स्पष्ट करत राजगड पोलिसांनी भविष्यातही अशा तपास मोहिमा नियमितपणे राबविण्याचा इशारा दिला आहे.


### फडणवीस यांना तुरुंगात टाकण्याचा कट : नितेश राणे

पुणे, ता. ११ : राज्यात महापालिकांच्या निवडणुकीचा प्रचार ऐन जोमात असताना सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहे. महायुती सरकारमधील मंत्री नितेश राणे यांनी आज जाहीर पत्रकार परिषद घेऊन खळबळजनक दावा केला आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना देवेंद्र फडणवीस यांना तुरुंगात टाकण्याचा कट रचण्यात आला होता, असा आरोप नितेश राणे यांनी केला आहे. खऱ्या अर्थाने सत्तेचा गैरवापर काय असतो? याची प्रचिती आम्हाला ठाकरे सरकारच्या काळात आली. त्यावेळी विरोधी पक्षातील प्रत्येक नेत्याला खोट्या गुन्ह्यात अडकून तुरुंगात कसे टाकायचे, हा एक कलमी कार्यक्रम सुरू होता, असेही नितेश राणे म्हणाले. त्यांच्या या आरोपानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# स्वरंक्षणासाठी शस्त्र बाळगणाऱ्या तरुणाला बेड्या; गुन्हे शाखेच्या युनिट ४ च्या पथकाची कारवाई

**हडपसर, ता. ११ :** मांजरी परिसरातून गुन्हे शाखेच्या युनिट-४ च्या पथकाने एका २२ वर्षीय तरुणाला बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याप्रकरणी अटक केली आहे. आदित्य अमोल ढसाळ (रा. वेदांत सोसायटी, मांजरी) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव असून, त्याच्याकडून एक गावठी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून शहरात गस्त वाढवण्यात आली असून, रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी सुरू आहे. त्याच दरम्यान गुन्हे शाखेच्या युनिट-४चे पथक चंदननगर परिसरात गस्त घालत असताना मांजरी



भागात एका तरुणाकडे बेकायदेशीर शस्त्र असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी वेदांत सोसायटी परिसरात सापळा रचला. संशयित तरुण परिसरात फिरताना आढळून आल्यानंतर त्याला थांबवून झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान त्याच्या पँटमध्ये खोचलेले अंदाजे ५२ हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत आदित्य ढसाळ याने, आपली वाद्य विक्रीची दोन दुकाने असून सोसायटी परिसरात अलीकडे काही वाद झाले होते. भविष्यात भांडणाची शक्यता लक्षात घेता स्वतःच्या सुरक्षेसाठी आपण हे शस्त्र खरेदी केल्याचे सांगितले. हे पिस्तूल त्याने रेकॉर्डवरील एका गुन्हेगाराकडून घेतल्याची माहितीही पोलिसांना मिळाली आहे. दरम्यान, स्वसंरक्षणाच्या नावाखाली बेकायदेशीर शस्त्र बाळगणे हा गंभीर गुन्हा असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, शस्त्र पुरवठ्याचे स्रोत आणि यामागील साखळीचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे.


### शिरूर परिसरात पत्ता विचारण्याच्या बहाण्याने सोन्याचे दागिने पळवले

**शिरूर, ता. ११ :** सरदवाडी (ता. शिरूर) आणि शिरूर शहरातील जोशीवाडी परिसरात पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलांना फसवून सोन्याचे दागिने चोरून नेल्याच्या दोन घटना घडल्या असून, दुचाकीस्वार चोरट्यांनी सुमारे चार तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पहिली घटना सरदवाडी येथील न्हावरा फाटा परिसरात घडली. रोहिणी सरोदे या सायंकाळी घरासमोर फेरफटका मारत असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांना पत्ता विचारत संभाषणात गुंतवले. त्याचवेळी त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाचे मिनी गंठण हिसकावून आरोपींनी पळ काढला.

त्यानंतर काही वेळातच शिरूर शहरातील जोशीवाडी परिसरात रंजना मेंगवडे या महिलेलाही याच पद्धतीने गाठण्यात आले. आरोपींनी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने जवळ येत त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हिसकावून दुचाकीवरून पसार झाले.

या दोन्ही घटनांची माहिती मिळताच नागरिकांनी शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळांचा पंचनामा केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला आहे. अज्ञात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिरूर पोलीस करत आहेत.

दरम्यान, महिलांनी अनोळखी व्यक्तींशी बोलताना विशेष सावधगिरी बाळगावी, तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



### कोल्हापूरच्या पोलिस अधिकारी वैष्णवी पाटील यांच्या कारचा अपघात

**कोल्हापूर, ता. ११ :** कोल्हापूर अँटी करप्शन ब्युरो मध्ये कार्यरत असलेल्या पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांच्या कारचा कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्याजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात त्यांच्या सोबत प्रवास करणाऱ्या दोघांचा जागीच मृत्यू झाला असून पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांच्यासह आणखी तिघे जण जखमी झाले आहेत. वैष्णवी पाटील यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांच्यावर चित्रदुर्ग येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही दुर्घटना आज पहाटे बेंगळुरूहून कोल्हापूरकडे परतताना घडली. पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील ज्या इनोव्हा कारमधून प्रवास करत होत्या, त्या कारची अचानक समोरून येणाऱ्या लॉरीशी जोरदार धडक झाली. धडक इतकी तीव्र होती की कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अपघाताच्या वेळी कारमध्ये असलेल्या दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघातानंतर जखमींना तातडीने चित्रदुर्ग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी इनोव्हा कार आणि लॉरी यांच्यातील जोरदार धडकेमुळे हा भीषण अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे कोल्हापूर पोलीस दलासह अँटी करप्शन ब्युरोच्या वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. संबंधित प्रकरणाचा पुढील तपास कर्नाटक पोलीस करत आहेत.

## अजित पवारांवर बोलण्याची माझी कुवत नाही : महेश लांडगे नरमले

**पिंपरी, ता. ११ :** पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक प्रचारादरम्यान उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्यातील राजकीय वाद चांगलाच वाढला होता. प्रचारादरम्यान आमदार लांडगे यांनी अजित पवार यांचा एकेरी उल्लेख केल्याने वातावरण तापले होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत आमदार लांडगे यांनी भूमिका बदलल्याचे दिसून आले.

आकुर्डी येथे झालेल्या सभेत बोलताना आमदार महेश लांडगे म्हणाले, माझी आणि अजित पवार यांची उंची तुलना करता येणार नाही. ते राज्याचे नेतृत्व करतात. त्यांच्यावर बोलण्याची माझी कुवत नाही. या वक्तव्यामुळे त्यांच्या भूमिकेत नरमाई आल्याचे स्पष्ट झाले.

महापालिकेत २०१७ मध्ये भाजपची सत्ता आल्यानंतर शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली, असे सांगत लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अनेक महत्त्वाचे निर्णय झाल्याचा उल्लेख केला. रेडझोनचा प्रश्न मार्गी लावणे, प्राधिकरणाच्या ९८ हजार मालमत्ता फ्री होल्ड करणे, ५२ वर्षांनंतर साडेबारा टक्के परतावा देणे, स्वतंत्र पोलीस आयुक्तालय आणि न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत मंजूर करणे, ही सर्व कामे भाजप सरकारमुळे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्यावर झालेल्या आरोपांना आपण योग्य प्रकारे उत्तर दिले असल्याचे नमूद करत लांडगे म्हणाले, महायुतीतील नेत्यांचा आदर फक्त भाजपनेच करायचा का? शिरूर लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला सोडला असताना आम्ही संयम राखला. राष्ट्रवादीच्या उमेदवारासाठी मनापासून काम केले. भोसरीतून मोठे मताधिक्य दिले. तरीही आमच्याविरोधात खोटे कथानक पसरवले जात आहे.

दरम्यान, झोपडपट्टी पुनर्वसन (एसआरए) योजनेच्या माध्यमातून नागरिकांना धमकावले जात असल्याचा मुद्दा आमदार लांडगे यांनी उपस्थित केला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडत सांगितले की, राज्यात कायद्याचे राज्य चालेल. एसआरएच्या नावाखाली धमक्या देणाऱ्यांना पोलिस योग्य उत्तर देतील. एसआरएचा अध्यक्ष मुख्यमंत्री म्हणून मीच आहे. नागरिकांना कोणताही त्रास होऊ दिला जाणार नाही.

## पूजा खेडकरच्या बंगल्यात दरोडा; आई–वडील, रखवालदार बेशुद्ध अवस्थेत सापडले

**पुणे, ता. ११ :** विविध वादांमुळे चर्चेत आलेल्या पूजा खेडकर यांच्या कुटुंबाला चोरीच्या घटनेचा धक्का बसला आहे. पुण्यातील बाणेर रस्त्यावरील खेडकर कुटुंबाच्या बंगल्यात घरातीलच एका नोकराने चोरी केल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणी चतुःशृंगी पोलिसांकडे तक्रार देण्यात आली असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पूजा खेडकर यांनी पोलिसांना दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, खेडकर कुटुंबाच्या बंगल्यात कुटुंबीयांसह काही कामगार राहतात. यापैकी एक कामगार काही दिवसांपूर्वी नेपाळहून कामासाठी आला होता. याच कामगारावर चोरीचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. शनिवारी रात्री संबंधित कामगाराने दिलीप खेडकर व



मनोरमा खेडकर यांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केल्याचा दावा आहे. त्यानंतर पूजा खेडकर यांना बांधून ठेवून घरातील मोबाईल फोन घेऊन तो पसार झाल्याचे सांगण्यात आले.

घटनेनंतर पूजा खेडकर यांनी स्वतःची सुटका करून घेत चतुःशृंगी पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी दिलीप व मनोरमा खेडकर हे दोघेही बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. त्यांना तात्काळ खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान, पूजा खेडकर यांनी अद्याप पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केलेली नसून, मनस्थिती स्थिर झाल्यानंतर तक्रार देणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. मोबाईल फोन व्यतिरिक्त घरातून आणखी कोणत्या वस्तू चोरीला गेल्या आहेत, याबाबतची माहिती तपासानंतर स्पष्ट होणार आहे, असे पोलिसांनी सांगितले.

## जिल्हा परिषद निवडणुका लांबणीवर?

**पुणे, ता. ११ :** राज्यात सध्या २९ महापालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकांनतर राज्यातील ज्या ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे, त्या सोडून १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडणार असल्याची शक्यता आहे.




खरंतर सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ या पूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश राज्य निवडणूक आयोगाला दिले होते. मात्र, दिलेली मर्यादा ओलांडून त्यानंतर काही दिवसांत झेडपीच्या निवडणुका होतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. अशातच आता या प्रकरणी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली असल्याने झेडपी निवडणूक पुन्हा लांबणीवर पडणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे आता राज्य निवडणूक आयोगाची डोकेदुखी वाढली आहे.

दाखल केलेल्या याचिकेबाबत आज सोमवारी सुनावणी होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील कुडूवाडी येथील जिल्हा परिषद पंचायत समिती मेंबर्स असोसिएशनचे पदाधिकारी कैलास जगन्नाथ गोरे यांनी ही याचिका दाखल केली आहे. या याचिकेत नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच जिल्हा परिषदांनाही ५० टक्के आरक्षणाची अट शिथिल करून निवडणुका घेण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाने पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घेण्याची तयारी पूर्ण केली होती. या निवडणुकीचा कार्यक्रम देखील जाहीर करण्याच्या तयारीत राज्य निवडणूक आयोग होते. या सगळ्यात याचिका दाखल करण्यात आल्याने आजच्या सुनावणीत कोर्ट निवडणुकीबाबत काय भूमिका घेणार? कोणता निर्णय घेणार? यावर निवडणुका नेमक्या कधी होणार? हे स्पष्ट होणार आहे. मात्र, याचिकेमुळे पुन्हा एकदा झेडपीच्या निवडणुका लांबणीवर पडणार असल्याची चर्चा आहे.

# लोणी काळभोर, वाघोली, लोणीकंद, पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुगार व दारू अड्ड्यांवर छापा

**लोणी काळभोर, ता. ११ :** पुणे शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोणी काळभोर, लोणीकंद, व वाघोली भागात अवैध दारू व जुगार अड्ड्यांवर गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने छापा कारवाई केली.

लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कदमवाकवस्ती परिसरातील पांडवदंड रोड परिसरात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने धाड टाकली या कारवाईत पोलिसांनी बसवराज इरप्पा रामपुरे (वय ६५), निलेश सुरेश फुलपगर (वय ३४), सचिन बाबुराव काळभोर (मालक), रमेश वसंत बामणे (वय ५७) आणि गणेश नारायण सोनवणे (वय ३१) यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण १२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुनील रामधन राठोड वय ४३, रा. बालाजी निसर्ग सोसायटी, शिरसवाडी, ता हवेली ( रायटर ) संजय विलास चांदणे (वय -२८, रा. बोल्हाई माता मंदिर पाठीमागे, वाडेबोल्हाई, ता हवेली, खेळी) दगडू शिवराम वाघमारे (वय ५१, रा. बालाजी निसर्ग सोसायटी, शिरसवाडी, ता हवेली, मालक) हे जुगार खेळत असताना मिळून आले आहेत. त्यांचे ताब्यात रोख रक्कम, जुगार खेळण्याचे साहीत्य असा एकूण१२ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जुगार अड्ड्यांवरील कारवाईत शिरसवाडी येथील बालाजी निसर्ग सोसायटी परिसरात सुरू असलेल्या




जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. यामध्ये सुनील रामधन राठोड (वय ४३, रायटर), संजय विलास चांदणे (वय २८, खेळी) आणि दगडू शिवराम वाघमारे (वय ५१, मालक) हे जुगार खेळत असताना मिळून आले. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण १२,०५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाघोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दारूविरोधी कारवाईत आव्हाळवाडी (ता. हवेली) परिसरात सुरेखा दिनेश नानवत (वय ३०, रा. आव्हाळवाडी रोड, वाघोली, पुणे) हिचे ताब्यातून ६ हजार ५०० रुपयांची हातभट्टीची तयार दारू जप्त करण्यात आली. तर वेंकटप्पा बिचप्पा गौड (वय ५१, रा. जाधव वस्ती, केसनंद, ता. हवेली) याचे ताब्यातून७ हजार ५०० रुपयांची १०० लीटर तयार ताडी जप्त करण्यात आली. तसेच मुकुंद रघुनाथ निकाळजे (वय ५०, रा. पिंपरी सांडस, ता. हवेली) याचे ताब्यात एकूण ४७४० रुपये किमतीच्या देशी विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, आगामी काळात होणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखेची विविध पथके कार्यरत आहेत. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने लोणीकंद, वाघोली आणि लोणी काळभोर पोलीस स्टेशन हद्दीतील विविध भागांत अवैध दारू व जुगार अड्ड्यांवर छापा कारवाई करत त्यांचा उच्छेद केला आहे.

सदरची कामगिरी पोलीस उपआयुक्त गुन्हे निखिल पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे-२ राजेंद्र मुळीक या वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक वाहीद पठाण व त्यांचे यूनिट ६ कडील पथकाने केलेली आहे.

# दौंडमध्ये नायलॉन मांजाची विक्री एकावर गुन्हा दाखल; मुद्देमाल जप्त



**दौंड, ता. ११ :** नायलॉन मांजाची अवैध विक्री करणाऱ्या एका महिलेविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मकर संक्रांत सणाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी (ता. १०) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास खाटीक गल्ली, ता. दौंड येथे हि कारवाई करण्यात आली.

रोशन युनुस शेख (वय ६०, रा. खाटीक गल्ली, दौंड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. तिच्यावर पर्यावरण संरक्षण कायदा व भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई पवन शंकर माने (वय २८) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनीदिलेल्यामाहितीनुसार, मकर संक्रांत सणाच्या पार्श्वभूमीवर दौंड पोलिसांचे पथक हद्दीत गस्त घालीत होते. यावेळी रोशन शेख हिच्या घरातून पतंग उडविण्यासाठी वापरला जाणारा नायलॉन मांजा विक्रीसाठी साठवून ठेवलेला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक दौंड पोलीस ठाणे यांच्या आदेशानुसार पथकाने दोन पंचांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला. झडतीदरम्यान घरातील पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये विविध कंपन्यांचे नायलॉन मांजाचे एकूण चार रोल आढळून आले. त्यामध्ये ब्लॅक पँथर, डायमंड, बी.पी.बी. व हंगामा कंपनीच्या मांजाचा समावेश असून त्याची एकूण किंमत सुमारे एक हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सदर नायलॉन मांजा पंचनामा करून जप्त करण्यात आला असून, शासनाने नायलॉन मांजाची निर्मिती, विक्री व वापरावर बंदी घातलेली असतानाही विक्री केल्याप्रकरणी आरोपी महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २९२, २९३, २२३ तसेच पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ चे कलम ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार किरण राऊत करत आहेत.

# फाइल अडविणारे मोफत वाहतूक सेवा देणार कशी?; चंद्रकांत पाटील यांची अजित पवारांवर टीका



**पुणे, ता. ११ :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील आरोप-प्रत्यारोप तीव्र झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी जाहीर केलेल्या संयुक्त जाहीरनाम्यातील घोषणांवरून उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे.

राज्याच्या तिजोरीत पैसे नाहीत, असे कारण देत मुलींच्या मोफत उच्च शिक्षणाची फाइल सहा महिने अडवून ठेवणारे अजित पवार आता पुणेकरांना मोफत पीएमपी व मेट्रो सेवा देणार कशी? असा सवाल पाटील यांनी उपस्थित केला. मोफत प्रवासासारखा निर्णय घ्यायचा असल्यास तो राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडावा लागतो आणि त्याचा अंतिम अधिकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.


पाटील म्हणाले, धोरणात्मक आणि आर्थिक निर्णय हे मंत्रिमंडळाच्या बैठकीतच घेतले जातात. पीएमपी आणि मेट्रो मोफत करण्याची घोषणा केली असली, तरी निवडणुकीत आपला पराभव अटळ आहे, हे माहिती असल्यानेच अजित पवार अशा घोषणा करत आहेत. त्यांनी विधानसभेत बार्टी, सारथी आणि आर्टी संस्थांच्या शिष्यवृत्तीवर मोठा खर्च होत असल्याचा मुद्दाही उपस्थित केला होता, अशी आठवण पाटील यांनी करून दिली.

तसेच, ७८ शिक्षण संस्थांचे अनुदान पुन्हा सुरू करण्याची फाइल तब्बल १२० वेळा परत पाठवण्यात आली. ५ हजार ५०० प्राध्यापकांच्या भरतीसाठीची फाइल मंजूर करून घेण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. मुलींच्या मोफत उच्च शिक्षणाची फाइल सहा महिने प्रलंबित ठेवण्यात आली होती, अशा विविध घटनांचा दाखला देत पाटील यांनी अजित पवार यांच्या कारभारावर टीका केली.

## भाजप ११५ जागा जिंकेल : पाटील

या वेळी झालेल्या पत्रकार परिषदेत चंद्रकांत पाटील यांनी पुणे महापालिकेत भाजप ११५ जागा जिंकेल, असा दावा केला. पुण्यात भाजपचाच महापौर होणार असून, प्रभागनिहाय महापौरपदासाठीची नावेही निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. भाजपला बहुमत मिळाल्यास, पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेसला सत्तेत सहभागी करून घेण्याबाबत विचार करावा लागू शकतो, असे सूचक विधानही पाटील यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे महापालिका निवडणुकीनंतरच्या राजकीय समीकरणांबाबत चर्चेला उधाण आले असून, राजकीय वर्तुळात याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

# जूळ्या मुलांना विहिरीत ढकलून देत वडिलांनी केले विष प्राशन; बहिणभावाचा मृत्यू



**करमाळा, ता. ११ :** केतूर नं. (ता. करमाळा) येथे पित्यानेच आपल्या जुळ्या मुलांना विहिरीत ढकलून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, या घटनेत दोन्ही मुलांचा बुडून मृत्यू झाला आहे. शिवांश सुहास जाधव आणि श्रेया सुहास जाधव (वय ८) अशी मृत मुलांची नावे आहेत. ही घटना शनिवारी (ता. १०) दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

या प्रकरणातील संशयित आरोपी सुहास जाधव (वय ३२) याने कृत्यानंतर घटनास्थळावरून पलायन केले होते. मात्र, त्याने फोनवरून आपल्या जवळच्या नातेवाइकाला घटनेची माहिती दिल्याने हा प्रकार समोर आला. माहिती मिळताच करमाळा पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून सुहास जाधव याला टेंभुर्णी परिसरातून ताब्यात घेतले.

पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर सुहास जाधव याने आपण विष प्राशन केल्याचेसांगितले.त्यानंतरपोलिसांनी त्याला तातडीने उपचारासाठी बार्शी येथील रुग्णालयात दाखल केले आहे. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असून, त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, विविध शक्यतांच्या आधारे पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

दरम्यान, हिंगणी हद्दीतील संबंधित विहिरीतून दोन्ही मुलांचे मृतदेह केत्तूर येथील मच्छीमार बांधव नितीन पत्तुले, सागर चमरे, दादासाहेब पत्तुले, राम चमरे आणि परशुराम भोई यांनी बाहेर काढले. मृतदेह शवविच्छेदनासाठी करमाळा येथील उपजिल्हा रुग्णालयात रात्री उशिरा पाठवण्यात आले. उल्लेखनीय बाब म्हणजे, ज्या विहिरीत या घटनेचा घडामोडी घडल्या, त्याच विहिरीत सुमारे आठ ते नऊ वर्षांपूर्वी सुहास जाधव याचा भाऊ पप्पू जाधव याचा विजेचा करंट लागून मृत्यू झाला होता. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त कली जात आहे.

# अहिल्यानगरमधील भाजप–राष्ट्रवादीची युती म्हणजे साप मुंगूस एकत्र!

## शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांची टीका



**अहिल्यानगर, ता. ११ :** एकीकडे भाजप उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका करत असताना, दुसरीकडे अहिल्यानगरमध्ये त्यांच्याच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी युती करत आहे. ही साप आणि मुंगूस यांची युती आहे. जो शिवसेनेला आडवा येईल, त्याचा सर्वनाश होईल, अशी टीका शिवसेना (शिंदे गट) नेते तथा मंत्री गुलाबराव पाटील यांनी केली.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ शनिवारी दुपारी शहरातील गांधी मैदानात आयोजित सभेत ते बोलत होते. नियोजित वेळेपेक्षा सुमारे तीन तास उशिरा सभा सुरू झाली. या वेळी शिवसेनेचे पदाधिकारी सचिन जाधव, अनिल शिंदे, संजीव भोर, बाबुशेठ टायरवाले, दिलीप सातपुते यांच्यासह उमेदवार व कार्यकर्ते उपस्थित होते.

गुलाबराव पाटील म्हणाले, भाजपने काँग्रेससोबत युती केली असून काँग्रेसचे १२ नगरसेवक भाजपमध्ये घेतले आहेत. काँग्रेस संपवण्याची भाषा करणाऱ्या भाजपमध्येच आता काँग्रेस वाढत आहे. भगवा झेंडा घेणाऱ्या भाजपने एमआयएमसोबतही युती केल्याने बापरे म्हणण्याची वेळ आली आहे. अहिल्यानगरमध्ये मित्रानेच आमचे लव्ह मॅरेज तोडले, त्यामुळे आम्ही येथे स्वबळावर लढत आहोत, अशी टीकाही त्यांनी केली.

नगर शहरात दहशत आणि दडपशाही सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की, शिवसेनेच्या उमेदवारांना धमक्या दिल्या जात आहेत. मात्र, गुन्हे दाखल होणे शिवसेनेसाठी नवीन नाही. आम्ही बॅचलर ऑफ जेल आहोत. जितके शिवसेनेला दाबाल, तितके आम्ही अधिक ताकदीने उभे राहू, असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले.

शहराच्या विकासासाठी नगरविकास खाते महत्त्वाचे असून ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. शिवसेनेच्या हाती सत्ता दिल्यास विकासाचा निधी थेट महापालिकेला मिळेल, असे सांगत पाटील यांनी शिवसेनेला मत देण्याचे आवाहन केले. तसेच लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करत बहिणींनी एकनाथ शिंदे यांना विसरू नये, असेही त्यांनी सांगितले.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## तरुण वयात केस पांढरे होण्याचे नेमकेकारण काय, जाणून घ्या

**पुणे, ता. ११ :** आजकाल कमी वयातच केस पांढरे होण्याची समस्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. तज्ज्ञांच्या मते केस अकाली पांढरे होण्यामागे केवळ बाह्य कारणे नसून, शरीरातील व्हिटॅमिन बी१२ची कमतरता हे एक महत्त्वाचे कारण आहे. केसांचा नैसर्गिक रंग मेलॅनिन या रंगद्रव्यावर अवलंबून असतो.

शरीरात व्हिटॅमिन बी१२चे प्रमाण कमी झाल्यास मेलॅनिनचे उत्पादन घटते आणि त्यामुळे केस काळ्याऐवजी हळूहळू पांढरे होऊ लागतात. व्हिटॅमिन बी१२ हे लाल रक्तपेशी तसेच मज्जासंस्थेच्या कार्यासाठी अत्यावश्यक मानले जाते. याची कमतरता असल्यास केस कमजोर होतात आणि अकाली पांढरे होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू होते.

तज्ज्ञ सांगतात की ताणतणाव, अपुरी झोप, असंतुलित आहार आणि बदललेली जीवनशैली यामुळेही ही समस्या अधिक वाढते. विशेषतः जंक फुडचे वाढलेले सेवन आणि पौष्टिक आहाराकडे होणारे दुर्लक्ष केसांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करते.

व्हिटॅमिन बी१२ ची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात अंडी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, मांस, मासे तसेच मशरूम यांचा समावेश करण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. यासोबतच हिरव्या पालेभाज्या, फळे, प्रथिनेयुक्त आहार आणि भरपूर पाणी पिणे आवश्यक असल्याचेही ते सांगतात. योग्य आहार, पुरेशी झोप आणि ताणतणावमुक्त जीवनशैली अंगीकारल्यास केस निरोगी राहतात आणि त्यांचा नैसर्गिक रंग दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

# अनेकांना निवडणुकीतच कंठ फुटतो; देवेंद्र फडणवीसांची अजित पवारांवर टीका

**पिंपरी, ता. ११ :** निवडणूक जाहीर झाल्यापासून अनेकजण आरोप करत असल्याचे महेश लांडगे यांनी सांगितले. ते वैतागले होते. पण निवडणुका आल्यानंतर अनेकांना कंठ फुटतो. त्यांच्याकडे सांगायला काहीच विकासकामे नाहीत, मुद्दे नाहीत. त्यामुळे विकासच्या मुद्द्यावर न जाता वादावादी करण्याचा प्रयत्न ते करत असल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शनिवारी (ता. १०) आकुर्डी येथे केली.



पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आकुर्डीमध्ये जाहीर सभा झाली यावेळी ते बोलत होते. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, निवडणूक प्रमुख व आमदार शंकर जगताप, महेश लांडगे, अमित गोरखे, उमा खापरे आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी राज्यात महायुतीत सत्तेत असलेले भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस आमनेसामने आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या नऊ वर्षांमध्ये शहरामध्ये झालेल्या भ्रष्टाचारावरून भाजपच्या स्थानिक नेत्यांना घेरले आहे. उपमुख्यमंत्री पवार आणि आमदार महेश लांडगे यांच्यामध्ये यावरून टोकाचा संघर्ष पाहयला मिळत आहे. याबाबत बोलत असताना फडणवीस यांनी लांडगे यांना टीका न करता आपली कामे दाखविण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, हे शहर राज्यातील वेगाने विकसित होणारे शहर आहे.

सन २०१४ नंतर राज्यात भाजपाची सत्ता आल्यानंतर या शहराला बदलण्याचे काम आम्ही केले. त्यामुळे शहराचा कायापालट झाला असून आधी ज्यांची सत्ता होती. त्यांना हे जमले नाही. त्यामुळे त्याचा हा रागराग आहे. जेएनयुआरएम अंतर्गत हजार घरांचे बांधकाम केले ते १५ वर्ष आधीच्या सत्ताधाऱ्यांनी रखडवले होते. मात्र, भाजपची सत्ता आल्यानंतर आम्ही पंतप्रधान आवास योजनेतून अनेक ठिकाणी घरे दिली. आता जे टीका करत आहेत, त्यांनी ती घरे जाऊन बघावी. महापालिका शाळांचा दर्जा सुधारला असून आज ५१ हजार विद्यार्थी महापालिका शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांना डीबीटीच्या माध्यमातून शालेय साहित्य देण्याचे काम आम्ही करतो. महिलांसाठी १३० कल्स्टर उभारत त्यामध्ये महिलांना प्रशिक्षण दिले. त्यामुळे १० हजार महिलांना रोजगार मिळाला आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करून वीजनिर्मिती केली आहे. असे अनेक प्रकल्प केले असून पुढे देखील महत्वाची कामे करायची आहेत. त्यासाठी भाजपच्या उमेदवारांना पुन्हा संधी देण्याचे आवाहन त्यांनी केले.

### निळ्या पूररेषेबाबत पुन्हा सर्व्हे


या शहरामध्ये निळ्या व लाल पूररेषेचा मुद्दा आहे. तसा तो अनेक शहरामध्ये आहे. ज्यावेळी याबाबत नियम तयार केला, तो १०० वर्षांपूर्वीच्या गृहीतकांवर आधारित आहे. त्यामुळे या पूररेषांचे पुन्हा सॅटेलाईट व आधुनिक तंत्रज्ञानाच्या सह्याने सर्व्हेक्षण करण्यात येईल. तसेच युडीसीपीआरमध्ये बदल करत हा मुद्दा कायमचा सोडवणार असल्याचे आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिले.

## शिवसेना शिंदे गटाचा भाजपाला टोला

**पिंपरी, ता. ११ :** काँग्रेसला संपवण्याची भाषा करणाऱ्या भारतीय जनता पक्षात आता काँग्रेसच वाढत असल्याचा टोला शिंदे गटाचे नेते गुलाबराव पाटील यांनी लगावला. ते अहिल्यानगर महापालिका निवडणुकीच्या प्रचार सभेत बोलत होते. पिंपरी चिंचवडमध्ये भाजपाकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सतावले जात आहे आणि इकडे अहिल्यानगरमध्ये त्यांच्याच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी युती करीत आहे. महापालिकेत साप आणि मुंगूस एकत्र आले आहेत. जो शिवसेनेला आडवा येईल त्याचा सर्वनाश होईल, अशी टीका गुलाबराव पाटील यांनी केली. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगर परिषदेत भाजपाने काँग्रेसबरोबर युती केली, काँग्रेसचे नगरसेवक भाजपामध्ये सामील झाले. त्यामुळे काँग्रेस संपवण्याची भाषा करणाऱ्या भाजपामध्येच आता काँग्रेसच वाढत आहे. भगवा झेंडा घेणाऱ्या भाजपाने एमआयएमशीही युती करून बापरे म्हणायला लावले, असा टोलाही त्यांनी लगावला.

# अयोध्येतील राम मंदिर परिसरात नमाज पठणाचा प्रयत्न

**पुणे, ता. ११ :** अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर परिसरातील दक्षिण परकोट भागात एका तरुणाने नमाज पठण करण्याचा प्रयत्न केला, ज्याला तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांनी तातडीने रोखले आहे. परंतु, या घटनेमुळे मंदिर परिसरात एकच खळबळ उडाली होती. सध्या या तरुणाला सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेला तरुण हा काश्मीरचा रहिवासी असल्याचे समजते. हा तरुण राम मंदिर परिसरात शिरल्यानंतर त्याने दक्षिण परकोट भागात नमाज पठण करण्यास सुरुवात केली. तिथे उपस्थित असलेल्या काही भाविकांचे या प्रकाराकडे लक्ष गेले आणि त्यांनी तातडीने तेथे उपस्थित असलेल्या सुरक्षा रक्षकांना याची कल्पना दिली. सुरक्षा रक्षकांनी हस्तक्षेप करताच तरुणाने विशिष्ट संप्रदायाशी संबंधित घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे वातावरणात तणाव निर्माण झाला होता.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि गुप्तचर यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी त्वरित घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संबंधित तरुणाला ताब्यात घेऊन चौकशी सुरू करण्यात आली आहे. तो तरुण एकटाच आला होता की त्याच्यासोबत आणखी कोणी होते, तसेच या कृत्यामागे त्याचा नेमका काय उद्देश होता, या दिशेने तपास चक्रावली जात आहेत. विशेष म्हणजे, अयोध्येत कडेकोट बंदोबस्त असताना हा प्रकार घडल्याने सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.

अयोध्या जिल्हा प्रशासनाने अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया किंवा अधिकृत विधान जारी केलेले नाही. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही बाब अत्यंत संवेदनशील असल्याने सर्व बाबींची पडताळणी केल्याशिवाय अधिकृत माहिती दिली जाणार नाही.

दक्षिण परकोटाच्या ज्या भागात ही घटना घडली, त्या भागातील सीसीटीव्ही फुटेज देखील तपासले जात आहेत जेणेकरून या घटनेचा संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट होऊ शकेल. दरम्यान, राम मंदिरात दररोज लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. अशा परिस्थितीत घडलेल्या या प्रकारामुळे मंदिर परिसरातील सुरक्षा अधिक कडक करण्यात आली आहे. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि मंदिराचे पावित्र्य जपले जावे, यासाठी सुरक्षा रक्षकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

## कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवलेल्या गायींची सुटका

**दौंड, ता. ११ :** खाटीक गल्ली परिसरात गोवंश जातीच्या गायी कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याप्रकरणी दौंड पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत चार जर्शी गायी ताब्यात घेतल्या आहेत. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र पशुसंरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी (ता. १०) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास ईदगा मैदानाजवळ, दौंड येथे हि कारवाई करण्यात आली. असीफ कासम कुरेशी (रा. खाटीक गल्ली, दौंड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तपासादरम्यान आरोपी याच्या राहत्या घराजवळील काटवन परिसरात चार लहान-मोठ्या जर्शी गायी बांधून ठेवल्याचे आढळून आले. पोलीस चौकशीत सदर गायी कत्तलीच्या उद्देशाने आणून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली.

घटनास्थळी मानद प्राणी कल्याण अधिकारी तसेच गोरक्षक उपस्थित होते. पोलिसांनी चारही गायी ताब्यात घेऊन त्यांची सुरक्षिततेच्या दृष्टीने गोशाळेत रवानगी केली. जप्त करण्यात आलेल्या गायींची अंदाजे किंमत ४५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल करमचंद बाळासो बंडगर यांनी फिर्याद दिली असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पशुसंरक्षण कायदा १९५४ चे कलम ९ व ५४ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भरत जाधव करत आहेत.

## फडणवीसांच्या नार्को टेस्टची मागणी

**पुणे, ता. ११ :** राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडली असून त्या पाठीमागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच एकमेव कळीचे नारद आहेत, असे ते म्हणाले. काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सपकाळ बोलत होते. पुण्यासारख्या सुसंस्कृत शहराची ओळख आता कोयत्या गँगसारख्या दहशतीने होत आहे. जाती धर्मावरून तेढ निर्माण करत दंगलीचे प्रकार आणि हल्ले केले जात आहेत. मंत्र्यांच्या फोन टॅपींग प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांवर आरोप ठेवण्यात आले, त्यांनाच फडणवीस यांनी पोलीस खात्यात वरिष्ठ पद बहाल केले. तसेच ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्या अजित पवार यांनाच सत्तेत सहभागी करून घेतले आहे, अशी टीकाही सपकाळ यांनी केली.

# निवडणुकीनंतरच लाडक्या बहिणींना ३ हजार रुपये द्या; काँग्रेसचे थेट निवडणूक आयोगालाच पत्र

**मुंबई, ता. ११ :** महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिले जाणारे तीन हजार रुपये निवडणुकीनंतरच वितरित करावेत, अशी मागणी काँग्रेसने राज्य निवडणूक आयोगाकडे पत्राद्वारे केली आहे. या मागणीवरून मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली असून, लाडक्या बहिणींविरोधातील काँग्रेसचा द्वेषाचा चेहरा उघड झाला आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.




बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या चेहऱ्यावरचा आनंद काँग्रेसला पाहवत नाही. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर सुरुवातीपासूनच काँग्रेसकडून या योजनेला विरोध करण्यात येत आहे. याआधी काँग्रेस समर्थक कार्यकर्त्यांनी ही योजना बंद करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती, असे त्यांनी नमूद केले.

बहिणींच्या खात्यात पैसे जमा होत आहेत, त्यांच्या संसाराला आधार मिळतो आहे. हे पाहून काँग्रेसचा द्वेष, मत्सर आणि आकस पुन्हा उफाळून आला आहे, असा आरोप बावनकुळे यांनी केला. संक्रांतीच्या पर्वावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ या दोन महिन्यांचे एकत्रित तीन हजार हजार रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा करणार आहे. मात्र, हे पैसे देऊ नयेत म्हणून काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र दिले, असा दावा त्यांनी केला. काँग्रेसच्या या भूमिकेचा आम्ही तीव्र निषेध करतो आणि राज्यातील माता-भगिनी काँग्रेसला कधीही माफ करणार नाहीत, असे बावनकुळे म्हणाले.

दरम्यान, काँग्रेसने निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाच्या अगोदर दोन महिन्यांचे हजार रुपये एकत्रित देणे ही बाब १ कोटीहून अधिक महिला मतदारांवर प्रभाव टाकणारी असून, सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मतदान करण्यास प्रवृत्त करणारी आहे. हा प्रकार सामूहिक सरकारी लाच ठरतो आणि यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

दरम्यान, काँग्रेसने स्पष्ट केले की, लाडकी बहीण योजनेला आमचा विरोध नाही, मात्र डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ चे पैसे निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच वितरित करावेत, असे निर्देश आयोगाने सरकारला द्यावेत, अशी आमची मागणी आहे.


## शिंदे गटाचे गणेश नाईक यांना प्रत्युत्तर

**ठाणे, ता. ११ :** एकनाथ शिंदे यांनी आदेश दिल्यास गणेश नाईक यांचा टांगा कुठेही फरार होईल हे त्यांनाही कळणार नाही, अशी टीका शिवसेना शिंदे गटातील नेते व मंत्री शंभुराज देसाई यांनी माध्यमांशी बोलताना केली. चांगल्या चांगल्यांनी एकनाथ शिंदे यांचा नाद केलेला नाही. ज्यांनी त्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला, त्यांचे अख्खेच्या अख्खे सरकार गेले. त्यामुळे गणेश नाईक यांनी थोडासा संयम बाळगावा. शिंदे साहेबांचा टांगा पलटी करणे दूरची गोष्ट राहिली.

गणेश नाईकांनी आधी शिंदे साहेबांच्या कार्यकर्त्यांचा टांगा पलटी करून दाखवावा, असे आव्हानही मंत्री देसाई यांनी दिले. गणेश नाईक हे दोनवेळा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री होते आणि मी सुद्धा अडीच वर्ष ठाणे जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. मी ठाणे आणि नवी मुंबई महापालिकेच्या विकासाचे काम जवळून पाहिले आहे.

## मित्राचे भाडे भरण्यासाठी काकूच्या घरी दरोड्याचा प्रयत्न; अल्पवयीन पुतणीसह तिघे अटकेत

**पुणे, ता. ११ :** कल्याणीनगर परिसरातील एका सदनिकेत भरदिवसा लूटमारीचा प्रयत्न केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्याचा येरवडा पोलिसांनी २४ तासांत छडा लावला असून या प्रकरणात तिघांना अटक करण्यात आली आहे. चौकशीत एका अल्पवयीन युवतीने मित्राचे थकीत घरभाडे भरण्यासाठी नातेवाइकांच्या घरी लूटमारीचा कट रचल्याचे उघड झाले आहे.



यश मोहन कुऱ्हाडे (वय २०, रा. केसनंद), वृषभ प्रदीप सिंग (वय २१, रा. चऱ्होली, आळंदी रस्ता) आणि प्राज विवेक भैरामडगीकर (वय १८, रा. येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी एका महिलेने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

फिर्यादी महिला व त्यांचे पती कल्याणीनगर परिसरात वास्तव्यास आहेत. ५ जानेवारी रोजी दुपारी सव्वाचारच्या सुमारास महिला सदनिकेत असताना चेहरा झाकलेले दोन तरुण घरात शिरले. त्यांच्या हातात सुरी व दोरी होती. महिलेने प्रसंगावधान राखत दरवाजा लावण्याचा प्रयत्न केला व आरडाओरड केल्यानंतर सोसायटीतील नागरिक घटनास्थळी जमा झाले. नागरिक येत असल्याचे लक्षात येताच आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच येरवडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यात आले असता एक संशयित सोसायटी परिसरात थांबल्याचे आढळून आले. त्या वेळी फिर्यादी महिलेची अल्पवयीन पुतणी सदनिकेत उपस्थित होती. पोलिसांनी तिची चौकशी केली असता तिने दिलेल्या माहितीत विसंगती आढळून आली.

सखोल चौकशीत पुतणीने मित्राचे थकीत घरभाडे भरण्यासाठी काकूच्या घरी लूटमारीचा कट रचल्याची कबुली दिली. मात्र काकूने आरडाओरड केल्याने आरोपी घटनास्थळावरून पसार झाल्याचे तिने सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तिघा आरोपींना अटक केली. ही कारवाई अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ चारचे उपायुक्त चिलूमला रजनकांत आणि सहायक आयुक्त सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान व गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## रस्त्याच्या कडेला उभ्या दुचाकीस्वाराला उडवून डंपर उलटला; एकाचा मृत्यू

**नेवासे. ता. ११ :** नेवासे-शेवगाव राज्यमार्गावरील भानसहिवरे शिवारात शनिवारी (ता.१०) सकाळी सुमारे पाऊणे नऊ वाजता भीषण अपघात घडला. एका दूध डेअरीजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या राजेंद्र गंगाधर भोईटे (वय -५२, रा. भानसहिवरे, ता. नेवासे) यांना भरधाव वेगातील डंपरने जोराची धडक दिली. या अपघातात भोईटे यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.



धडक दिल्यानंतर डंपर चालकाने घटनास्थळावरून पलायन केले. मात्र, थोड्याच अंतरावर जाऊन सदर डंपर पलटी झाला. त्यानंतर काही अज्ञात व्यक्तींनी जेसीबीच्या मदतीने डंपर पुन्हा उभा करून तो घटनास्थळावरून झटपट पसार केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

अपघातानंतर गंभीर जखमी अवस्थेत राजेंद्र भोईटे यांना तातडीने नेवासे फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. ही माहिती मिळताच मृतकाच्या नातेवाईकांनी तीव्र संताप व्यक्त केला. अपघातातील डंपर आणि चालकाला तात्काळ अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा ठाम इशारा नातेवाईकांनी दिला. सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेनंतर सायंकाळी तीन वाजेपर्यंतही आरोपी चालक आणि डंपर पोलिसांच्या ताब्यात न आल्याने परिस्थिती तणाव पूर्ण झाली. मृतकाच्या नातेवाईक व पोलिसांमध्ये यावेळी जोरदार खडाजंगी झाल्याचे चित्र दिसून आले. अखेर दुपारी वाजल्यानंतर पोलिसांनी डंपरचा छडा लावत चालकासह वाहन ताब्यात घेतले. त्यानंतर मृतदेह नातेवाईकांनी ताब्यात घेऊन शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार केले. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

मृतक राजेंद्र भोईटे हे शनिशिंगणापूर येथे दर्शन घेऊन परतत असताना भानसहिवरे शिवारात फोन आल्याने त्यांनी रस्त्याच्या कडेला दुचाकी थांबवली होती. याच वेळी विरोधी दिशेने भरधाव आलेल्या डंपरने त्यांना जोराची धडक दिली. अपघातानंतर डंपर पलटी झाला असतानाही तो जेसीबीच्या सहाय्याने सरळ करून पसार करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# भ्रष्टाचाऱ्यांसोबत सत्तेत बसणार नाही; गणेश नाईकांनी एकनाथ शिंदेंना डिवचले

**ठाणे, ता. ११ :** ज्या लोकांचे हात भ्रष्टाचाराने बरबटले आहेत, त्यांच्याबरोबर राज्यकारभार करणे ही जनतेशी केलेली प्रतारणा आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळाले नाही तर या लोकांबरोबर बसणार नाही. हरामाच्या पैशांनी निर्माण केलेले साम्राज्य हे जास्त दिवस टिकत नाहीत, त्यामुळे या पापात आपण सहभागी होणार नाही, असा घणाघात वनमंत्री गणेश नाईक यांनी करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा डिवचले आहे.

नवी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत वनमंत्री गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या नगरविकास विभागाचे अक्षरशः वाभाडे काढले. गेल्या पाच वर्षांत नवी मुंबई शहराची पूर्णपणे वाट लावली आहे. या शहरात सामाजिक उपक्रमांसाठी आणि सेवासुविधांसाठी असलेले भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्यात आले आहेत. त्यातून अफाट माया गोळा करण्यात आली आहे.

मात्र हा भ्रष्टाचार करणाऱ्यांनी लक्षात ठेवावे की हरामाच्या पैशांनी निर्माण केलेले साम्राज्य हे तुटून पडते. हरामाच्या पैशांनी मोठ्या झालेल्या आणि गोरगरीबांचे स्वप्न तोडलेल्या लोकांना सुख कधीच मिळणार नाही. क्षणिक सुखासाठी आणि आपल्या स्वार्थाकरिता दुसऱ्याच्या जीवनात



आग लावण्याचा धंदा करणारे कधीच सुखी होणार नाही, जनता त्यांना कधीच माफ करणार नाही हे लवकर दिसेल, असेही फटकारे गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदे यांना यावेळी लगावले.

मी या जिल्ह्याचा तीन वेळा पालकमंत्री होतो. त्यावेळी जिल्ह्यात अनेक ठिकाणी माझ्याच विचारांच्या पक्षाची सत्ता होती. मात्र मला सत्तेचा उन्माद कधीच आला नाही. ज्यांना सत्तेचा उन्माद आला आहे, त्यांची गेल्या पाच वर्षांत ठाणे जिल्ह्यात दादागिरी सुरू आहे. मात्र त्यांचा उन्माद मोडून काढण्याची ताकद माझ्यामध्ये आहे हे त्यांनी ध्यानात ठेवावे, असा इशाराही गणेश नाईक यांनी यावेळी दिला.

३० हजार रुपये चौरस मीटर अंडरटेबल नवी मुंबई शहरात गेल्या पाच वर्षांत बांधकाम व्यावसायिकांची मोठी छळवणूक झाली आहे. सिडकोने बेसुमार भूखंडांची विक्री केली. टेंडरमध्ये मिळालेले भूखंड घेण्यासाठी थेट नगरविकास विभागाच्या प्रमुखांना भेटण्यास सांगण्यात आले आहे. तिथे ३० हजार रुपये अंडरटेबल मोजल्यानंतर टेंडरमधील भूखंड या बिल्डरांना देण्यात आला. मात्र यांच्या दादागिरीमुळे तक्रार करण्यासाठी एकही बिल्डर पुढे येत नाही, असा गौप्यस्फोट गणेश नाईक यांनी यावेळी केला.